— I.O. प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** उदगीर ग्रामीण

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0707 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/12/2023 19:32

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 27/12/2023

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2023

**Time From (वेळेपासून):** 12:34 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:34 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/12/2023 **Time (वेळ):** 19:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 025

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/12/2023 19:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भुसंपादन कार्यालयात, उपविभागीय अधिकारी कार्यालय,उदगीर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): कण्णा तानाजी कोंपले

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1996

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | हणमंतवाडी देवर्जन,उदगीर,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | हणमंतवाडी देवर्जन,उदगीर,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9284319187

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उमेश प्रकाश तोडकरी | | | 1. गोल्डन वुड्स सोसायटी,देगलुर रोड, उदगीर,उदगीर,उदगीर ग्रामीण,लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा | 2,000.00 |



Scanned with CamScanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

2,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी कृश्णा तानाजी कोंपले, वय 27 वर्शे, व्यवसाय षेती, रा. हणमंतवाडी (देवर्जन) ता. उदगीर जि. लातूर मो.नं. 9284319187.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी दिनांक 26/12/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांची कार्यालयात जावून भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितली. त्यांनी मला,उदया दिनांक 27/12/2023 रोजी रिंगरोड, उदगीर येथे सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले.

त्याप्रमाणे मी आज दिनांक 27/12/2023 रोजी सकाळी 09.30 वा. सुमारास वरील प्रमाणे संागितलेल्या ठिकाणी हजर आलो. पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली हे खाजगी वाहनाने सदर ठिकाणी त्यांच्या सोबत असलेल्या कर्मचाÚयांसह हजर येवून त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करुन देवुन माझे नाव गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे राहणार असुन षेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. माझी काकु नामे नरसाबाई ग्यानोबा कोंपले रा. हणमंतवाडी (देवर्जन) ता. उदगीर जि. लातूर येथील रहिवाषी असुन त्यांचे नावे हणमंतवाडी येथे गट नंबर 101 मध्ये एकुण 83 आर षेतजमीन होती. सदर षेती क्षेत्रापैकी 70 आर षेतीक्षेत्र हे सन 2008 मध्ये षासनाचे पाझर तलावासाठी भुसंपादीत करण्यात आली आहे◌े. सदर षेतीबाबतीचे व भुसंपादनाबाबतची सर्व कामे माझे काकुच्या वतीने मी पाहतो.

दि.20/11/2023 रोजी मी व माझी काकु पाझर तलावासाठी संपादीत करण्यात आलेल्या षेतजमीनीचा रक्कमेसंदर्भात उदगीर येथील भुसंपादन कार्यालय येथे जावुन संबंधीत कर्मचारी तोडकरी यांना भेटलो असता, त्यांनी मला व माझे काकुला पाझर तलावासाठी संपादीत करण्यात आलेल्या क्षेत्राकरीता मिळालेल्या मावेजाची रक्कम तुमच्या खात्यावर जमा झाल्याचा मोबदला म्हणुन व तुम्हाला पुढील अधिकच्या मावेजा मिळणेकरीता अपिलाची फाईल त्रुटी न काढता पाठविण्यासाठी मदत व मार्गदर्शन करतो म्हणुन 5,000/-रू. द्यावे लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली आहे.

त्यानंतर दि.04/12/2023 रोजी माझे काकुचे बॅक ऑफ महाराष्ट्रचे खात्यावर 4,56,714/-रू. रक्कम जमा झाली असता, षेतजमीनीच्या अधिकच्या मावेजासाठी अपिल करावयाचे असल्याने मी व काकु परत संबंधीत विभागातील कर्मचारी श्री तोडकरी यांचेकडे गलो असता, त्यांनी परत मला व काकुला 5,000/-रू. लाचेची मागणी केली आहे. तसेच त्यानंतर दि.18/12/2023 रोजी अधिकच्या मावेजाच्या अपिलासाठी दाखल केलेल्या कागदपत्रांची पोचपावती घेण्यासाठी संबंधीत विभागाचे कर्मचारी श्री तोडकरी यांचेकडे गेल्यानंतर परत 5,000/-रू. लाचेची मागणी केली आहे. संबंधीत कर्मचारी श्री तोडकरी यांना माझे काकुला किंवा मला लाच देण्याची इच्छा नसुन माझा किंवा माझे काकुचा त्यांचेषी कसलाही आर्थीक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही.''

अषा आषयाचे विचार विनिमय करुन काकुच्या संमतीने तक्रार दिली. मी दिलेली तक्रार पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने भुसंपादन विभाग, उदगीर कार्यालयातील श्री तोडकरी यांनी मला माझ्या वर नमुद केलेल्या कामासाठी लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही सर्वजण सदर ठिकाणाहुन खाजगी वाहनाने ओम गार्डन, रिंगरोड, उदगीर परीसरात



Scanned with CamScanner

आडबाजूस थांबून राहीलो.
त्यानंतर पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1400 कच्छवे यांचे मार्फतीने 11◌:36 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकावुन देगलुर रोडवरील येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर कार्यालयातील भुसंपादन कार्यालयात जाण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 रणेर असे तहसील कार्यालयातील भुसंपादन कार्यालयात जावून पांढÚया रंगाचा हाफ षर्ट व काळ्या रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती या तोडकरी असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली असता त्यांनी माझ्◌ो वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष माझेषी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान लोकसेवक तोडकरी म्हणाले... हं बोला सर... काय... दाम देताव? त्यावर मी म्हणालो... किती? त्यावर लोकसेवक तोडकरी म्हणाले.... अई तस काही नसतंय... नाराज होवुन द्यायच नाही... तुम्ही पाच रुपये दिले तरी मी घेतो... असं काही नाही... काहीच नाही... देवाषपथ कांहीच नाही.... मी असा माणुस नाही... कुणाला अडवणारा वगैरे....त्यावर मी म्हणालो... तवा त्या दिवषीच... सहया करायच्या दिवषी.... त्यावर लोकसेवक तोडकरी म्हणाले.... सहया करताना तुम्ही म्हणलो होतो, मी येतो म्हणुन पुन्हा.... त्यावर मी म्हणालो.... मग तेच आता अकाऊंटवर पैसे पडले नव्हते.... त्यावर लोकसेवक तोडकरी म्हणाले.... '' उग तुम्ही त्यला 10 हजार दे 25 हजार दे... असलं म्हणण्यामधी काही अर्थ नाही...तुम्हाला काय द्यायच ते द्या 100 रुपये दिलो तरी काय म्हणणार नाही...''त्यावर मी म्हणालो.... जावुन येतो मी एटीएम ला... त्यावर लोकसेवक तोडकरी म्हणाले.... केव्हाही या....असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 रणेर असे कार्यालयातून निघून बाहेर येवुन सापळा पथकाच्या वाहनाजवळ 11◌:47 वाजताचे सुमारास गेलो◌े असता पोकॉ कच्छवे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 रणेर यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व तोडकरी यांच्यात काय बोलणे झाले याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 रणेर यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कच्छवे◌े यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व लोकसेवक तोडकरी यांच्यात झालेले संभाशण ऐकुन ते पंच क्रमांक 1 रणेर यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन लोकसेवक तोडकरी यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे सुरुवातीला 5,000/- रुपये व नंतर तुम्हाला काय द्यायचे ते द्या, असे म्हणुन लाचेची स्वतः स्पश्ट मागणी करुन लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितल्याने तक्रारदाराने त्यांचेकडे उपलब्ध असलेले केवळ 4,500/-रुपये हजर केल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 4,500/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.
पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला लोकसेवक तोडकरी यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 09 भारतीय चलनी नोटा असे एकुण 4,500/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब यांनी मला व पंचाना अ◌ॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/1687 जाधव यांनी अ◌ॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील षर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या पांढरा गमजा काढून हातात घेणे बाबतचा सुनियोजीत ईषारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांच्या सुचनेनुसार पोलीस कर्मचारी कच्छवे यांनी व्हाईस रेकॉर्डर 12◌:30 वा. चालु करुन माझ्या गळयात आडकावुन दिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 रणेर असे तहसील कार्यालयातील भुसंपादन कार्यालयामध्ये जावुन मी लोकसेवक तोडकरी यांना म्हणालो.. काकुसोबत बोलणे झाले... त्यावर लोकसेवक तोडकरी म्हणाले... झालं का... त्यावर मी म्हणालो... काकुसोबत... त्यावर लोकसेवक म्हणाले... हं... त्यावर मी म्हणालो... म्हणले साडेचार हजार रुपये... लोकसेवक तोडकरी यांचेसमोर धरले असता... त्यावर लोकसेवक म्हणाले... आरं लई व्हायलेत... दोन हजार बस झाले.... अरे राहु दे टेन्षन घेवु नको... हं बस झाले....असे म्हणून त्यांनी त्यांचे उजव्या हाताने सदरची अ◌ॅन्थ्रासीन पावडरयुक्त 4,500/-रुपये (ज्यात 500/-रुपये दराच्या 09 भारतीय चलनी नोटा) लाचेची रक्कम स्वीकारुन त्यापैकी 2,000/-रू. (ज्यात 500/-रुपये दराच्या 04 भारतीय चलनी नोटा) षर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन उर्वरीत रक्कम 2,500/-रु. मला परत दिली आहे. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवून गळयातील गमजा हातात घेवुन नियोजीत लाचस्विकृतीचा इषारा केला. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब व पंच क्रमांक 2 काळे व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले ते त्यांनी घेवुन बंद केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 1 रणेर यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 रणेर यांनी समोर पांढÚया रंगाचा हाफ षर्ट व काळी पॅन्ट घातलेल्या व्यक्तीकडे हात



Scanned with CamScanner

करुन हे लोकसेवक तोडकरी असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांच्या समोर स्विकारुन आपल्या षर्टच्या छातीवरील डाव्या खिषामध्ये ठेवली आहे बाबत सांगितले. मी वर सांगीतलेल्या हकीकती प्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 रणेर यांनी सांगीतली. त्यावेळी पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र लोकसेवक तोडकरी यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्याचे नांव उमेष प्रकाष तोडकरी, वय 42 वर्शे पद-तलाठी ने. तहसील कार्यालय, उदगीर प्रतिनियुकी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर जि. लातूर, रा. गोल्डन वुडस् सोसायटी, देगलुर रोड, उदगीर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी पंच क्रमांक 2 काळे यांचे हस्ते तलाठी तोडकरी यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 रणेर यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरषी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्षनास आले. तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पोलीस निरीक्षक पुल्ली साहेब यांनी घटनास्थळावरील योग्य ती कार्यवाही आटपुन पुढील कार्यवाही करणे करिता तलाठी तोडकरी यांना सोबत घेवून घटनास्थळावरुन रवाना होवून पोलीस स्टेषन उदगीर षहर येथे येवून पुढील कार्यवाही पुर्ण केली.

तरी यातील उमेष प्रकाष तोडकरी, वय 42 वर्शे पद-तलाठी ने. तहसील कार्यालय, उदगीर प्रतिनियुकी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर जि. लातूर यांनी तक्रारदार यांचे काकुचे नावे मौजे हणमंतवाडी (देवर्जन) ता. उदगीर जि. लातूर येथील गट नं.101 मधील पाझर तलावासाठी संपादीत षेतजमीनीचा मावेजाची रक्कम खात्यावर जमा केल्याचा मोबदला म्हणुन व पुढील अधिकचा मावेजा मिळणेकरीता अपिलाची फाईल त्रूटी न काढता पुढे पाठविण्याच्या कामात मदत करतो म्हणुन लाचेची मागणी करून तुम्हाला काय द्यायचे ते द्या, असे म्हणुन 2,000/- रू. लाचेची रक्कम दिनांक 27/12/2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय, उदगीर येथील भुसंपादन कार्यालयात 12:34 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे. म्हणुन माझी आरोपी विरुध्द कायदेषिर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रिंट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Arvind Sambhaji Pawar(I (Inspector)) / POBN83230 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे, उदगीर ग्रामीण
ता:उदगीर, जि.लातूर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Arvind Sambhaji Pav
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN83230



Scanned with CamScanner